Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

**Vol. (II)**

12 January 2019

**SPECIAL ISSUE – 92**

# महिला सबलीकरणाच्या समस्या : आव्हाने आणि उपाय

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editor of This Issue**
**Prof. A.R. Bhosle**
Assist. Prof. Head of Dept. Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

**Dr. S.K. Gaike**
Assist. Prof. Dept. of Sociology
Vasant Mahavidalaya , Kaij, Dist. Beed

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 400/-



Scanned with Oken Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 | January 2019 | UGC Approved No. 40705
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय


| | | | |
|---|---|---|---|
| 39. | जागतिकिकरण आणि महिलांचे सबलीकरण | प्रा. विरभद्रेश्वर सामलिंग स्वामी | 106 |
| 40. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा.डॉ. अन्सारी एस. जी. | 109 |
| 41. | नारीवादी अध्ययन तथा लेखन की आवश्यकता | डॉ.व्यास सी.पी. | 111 |
| 42. | कळंब तालुक्यातील पारधी जमातीच्या स्त्रिंया आणि लिंगभाव विषमता | प्रा. ईश्वर लक्ष्मण राठोड | 113 |
| 43. | कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया | डॉ. चांगदेव निवृत्ती मुंढे, | 116 |
| 44. | मराठी स्त्रीवादी साहित्य, समाज आणि स्त्रिया | प्रा.डॉ. रामकिशन दहिफळे | 119 |
| 45. | महिलांमधील रोजगार योजने संदर्भातील जागरूकता आणि लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | डॉ. अनिता जिवतोडे (टेकाडे) | 121 |
| 46. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | श्री. बापू तुकाराम बाराते | 124 |
| 47. | साहित्य समाज आणि स्त्रिया | डॉ. जनार्दन काटकर | 126 |
| 48. | कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ आणि स्त्रियांपुढील आव्हान | डॉ. रेखा एम. शेरकर | 129 |
| 49. | परित्यक्ता स्त्रियांचे प्रश्न | प्रा.डॉ.संतोष देशमुख | 132 |
| 50. | भारतीय समाज व्यवस्थेला लागलेली किडः हुंडा प्रथा | प्रा.बोराडे तानाजी रामभाऊ | 134 |
| | कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा 2005 आणि स्त्रियांपुढील आव्हाने –एक समजाशास्त्रीय अभ्यास | डॉ. गायके एस.के., कांबळे एम.एस. | 136 |
| 51. | कौटुंबीक हिंसाचार व स्त्रिया | कांबळे दलित सुभाषराव | 140 |
| 52. | कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि आव्हाणे | डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे | 142 |
| 53. | मध्यम वर्गीय स्त्रियांपुढील आव्हाने | प्रा. कोल्हे टी. टी. | 143 |
| 54. | महिला चळवळ आणि स्त्रिया | प्रा.डॉ. विजय दि. पोकळे | 146 |
| 55. | महिला चळवळ आणि स्त्रिया | डॉ. यादव घोडके | 149 |
| 56. | मैत्रेयी पुष्पा के साहित्य में स्त्री और समाज | प्रा.श्रीमती पोटकुले हिरा | 151 |
| 57. | भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रिया आणि हुंडा प्रथा | भिमराव मोटे | 153 |
| 58. | भारतीय महिलांसमोरील समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. परळकर शशिकांत दत्तोपंत | 154 |
| 59. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.डॉ. आचार्य आर. डी. | 156 |
| 60. | महिला चळवळ आणि समाजसुधारकांचे योगदान | प्रा.डॉ. मोटे गितांजली सदाशिवराव | 158 |
| 61. | स्त्रीवादी अभ्यास, विकास आणि स्त्रीया | प्रा. गोदावरी व्ही. बन | 161 |
| 62. | भारतीय स्त्रि.विषयक कायद्याची वास्तविकता.विश्लेषत्मक अध्ययन | प्रा.सिताराम कचरु मोगल | 164 |
| 63. | वैश्विक लैंगिक अंतराल में भारत की स्थिति का अध्ययन | प्रा. छाया एस. तोटवाड, प्रा. डॉ. सुर्यकांत टि. पवार | 167 |
| 64. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा.सोनटक्के रमेश शंकरराव | 169 |
| 65. | लिंगभाव विषमता आणि स्त्रिया | प्रा. सुलभा बब्रुवान सोळंके | 172 |
| 66. | स्त्री विरोधी हिंसा- कारणे व उपाय | प्रा.डॉ.बी.एन.कावळे | 174 |
| 67. | लिंगभाव असमानता आणि बांधकाम क्षेत्रातील स्त्रियांच्या समस्या | प्रा. भोसले एस. | 176 |


Scanned with Oken Scanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal
ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676
Special Issue -92 , महिला सबलीकरणच्या समस्या : आव्हाने आणि उपाय
January 2019
UGC Approved No. 40705

# कौटुंबिक हिंसाचार कायदा–2005 आणि आव्हाणे

डॉ. रामचंद्र मुंजाजी भिसे
दिगंबर बिंदु महा. भोकर, जि. नांदेड.

---

**प्रस्तावना :**

भारतीय समाजात सामाजिक संस्थांना मानवाच्या गरजा पुर्ण करण्याची चौकट मानली जतो. या सर्व सा. संस्थांपैकी कुटुंब संस्थेला समाज व्यवस्थेचा कणा मानले जाते. कुटुंब संस्था ही मानवाच्याा जीवनात जिवंतपणा दर्शवणारी आहे. कुटुंब व्यवस्थेला चिरकाळ टिकवण्याची जबाबदारी स्त्री–पुरुष या दोन्ही घटकांवर समान महत्त्वाची आहे. परंतु भारतीय पुरुष प्रधान समाजात मात्र स्त्रीलाच जबाबदार धरले जाते. स्त्री ही मुक्या प्राण्याप्रमाणे दावनीला बांधली आहे. स्त्रीची डोली आगदी अनंदात घेऊन जातात. परंतु बघता बघता त्याच घरात त्या स्त्रीला कुटुंबातून अन्याय, अत्याचार व व्यभिचाराला बळी पडावे लागते. त्याला विविध कारणे व परिस्थितीही जबाबदार मानली जाते.

कुटुंबातील नवख्या स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायालाच कौटुंबिक हिंसाचार म्हटले जाते. कौटुंबिक हिंसाचार एक अत्यंत ज्वलंत व संवेदनशील प्रश्न बनलेला आहे. आज त्यावर कोणीही उघड–उघडपणे बोलण्यास तयार नाही. कारण प्रत्येकाला वाटते की, **'घरो घरी मातीच्या चुली'** या उक्तीप्रमाणे आहे. स्त्रिला व तिच्या मनाला समाजाची भिती दाखवली जाते आणि म्हटले जाते की, काही बाहेर बोलले, दाखवले तर समाज काय म्हणेल? म्हणून कौटुंबिक हिंसाचार निमुटपणे सहन केला जातो. कौटुंबिक हिंसाचारामागे सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे माणुसकीचा अनादर व मानवतेला काळीमा फासणारे कृत्य केले जाते. कौटुंबिक हिंसाचार म्हणजे केवळ शारीरिक, शाब्दिक, लैंगिक, मानसिक व आर्थिक छळ होय. हुंडा किंवा मालमत्तेसाठी स्त्रीला अपमानित करणे, शिवीगाळ करणे, मारणे, हत्या करणे, मनाविरुद्ध व्यभीचार करणे, शरीरावर यातना दायक कृत्य करणें, गर्भपात करणे, वांझ म्हणून त्रास देणे, माहेरच्या व्यक्तीवरून बोलणे, तीला नेहमी वंचीत, बहिष्कृत करुन तुच्छतेने वागवले जाते.

कौटुंबिक हिंसाचाराच्या कथा–व्यथा आजच्या नसून रामायण–महाभारतापासूनच्या आहेत. त्याची अनेक उदाहरणे जगासमोर आहेत. यात गरीब–श्रीमंत, शिक्षीत–अशिक्षित, जात–जमात, धर्म, पंथ, वंश, नोकरी करणारी–नौकरी न कारणारी, ग्रामीण, शहरी इत्यादी भेद केला जाता नाही. फक्त प्रमाण काही अंशी कमी–अधिक दिसेल. कौटुंबिक हिंसाचार हा समाजाला काळीमा फासणारी बाब आहे. प्रत्येक स्त्री–पुरुषाला समानता स्वातंत्र्य, बंधुता, न्याय, हक्क, अधिकार आहेत. पुरुष प्रधान समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांना गौण दर्जा देऊन स्त्रीला हिंसाचाराला बळी दिले जाते. त्यासाठी समाजात आतापर्यंत विविधांगी प्रयत्न झालेले आहे. परंतु सर्व प्रयत्नातून अपेक्षित फल प्राप्ती मात्र समोर आलेली नाही. समाजात परिवर्तनाच्या व आधुनिकीकरणाच्या लाटेत कौटुंबिक स्त्री हिंसाचार कमी होण्याऐवजी वाढ झालेली समाजासमोर आले. त्या शरमेपोटी शासनाला 2005 मध्ये कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा करावा लागला. प्रत्यक्षात 26 ऑक्टोर 2006 पासून अंमलबजावणी सुरु केली आणि हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रीयांना दिलासा दिला.

**2005 चा कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा :**

आधुनिक परिवर्तीत मानवी समाजातील नितीमुल्यांच्या घसरणीमुळे व औद्यागिकीकरणामुळे स्त्रीची वंदनिय व्यवस्थेतून दयनीय अवस्थेत ढकलले दिसते. या बाबीला पुरावा म्हणजे वर्तमान पत्रातील दैनंदिन घडणाऱ्या घटनातून स्त्रिचा हिंसाचार किंवा बळी पडलेली घटना समोर येतात. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारांपासून व कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण व हक्क प्राप्तीसाठी आजपर्यंत विविध केलेले कायदे आहेत.

1. भारतीय दंड विधान कायदा– 1860
2. हुंडा प्रतिबंधक कायदा– 1961
3. सती प्रथा विरोधक कायदा– 1987
4. स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन विरोधी कायदा– 1986
5. घटस्फोट कायदा– 1869
6. कुटुंब न्यायालय कायदा– 1984
7. मुस्लीम महिलांसाठी कायदा– 1986
8. गर्भपात व गर्भलिंग परिक्षण कायदा–1971
9. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा– 2005

...रील सर्व प्रकारच्या कायद्यांतर्गत स्त्रीयांना हक्क व संरक्षण मिळणे अपेक्षित होते. परंतु ते न झाल्याने 2005 चा ...त सक्षम कायदा म्हणून मानला जातो. कौटुंबिक हिंसा ही आपण सर्वात सुरक्षित समजणाऱ्या घरात होते. ...सा या विषयावर सर्वेक्षण अहवाल सादर करणाऱ्या प्रसिद्ध लेखकाच्या मते, **'स्त्री ही काळोख्या रात्री ...वर अनोळखी इसमासोबत एकदा सुरक्षित राहिल, परंतु घराच्या चार भिंतीमध्ये आपल्याच घरातील ...रक्षित असेलच असे नव्हे.'** 2005 चा कायदा हा बहुतेक स्त्रीयांच्या संदर्भातील सर्व तरतुदी व कायदे ...णारा व स्त्रीला कौटुंबिक हिंसचारापासून संरक्षण देणारा मानला जातो. म्हणून म्हटले जाते की, ...स्त्रीचा मानवी हक्क व अधिकार असून सर्वांगीण विकासाची नांदी आहे. स्त्री हिंसाचार म्हणजे



Scanned with Oken Scanner

कौटुंबिक विकासाचा अडथळा आहे. याच संदर्भात काही जागतिक बाबींचाही उल्लेख करणे महत्त्वाचे वाटते. व्हिएतनाम समझोता– 1994. बिजींग अधिघोषणा–1995 व संयुक्त राष्ट्र कृती समिती 1989 च्या कॉमन रेकम डेशननुसार संबंधित देशांनी स्त्रियांच्या कौटुंबिक हिंसाचाराविरुद्ध संरक्षण पुरविण्यासाठी पावले उचलावित व तसा कायदा निमार्ण करावा विशेष करून स्त्रियांना कुटुंबात होणाऱ्या हिंसाचारापासून संरक्षण करीता भारताने 2005 मध्ये कायदा पारीत केला गेला.

**2005 कायद्यांतर्गत असलेल्या ठळक तरतुदी :**

1. 2005 च्या कायद्यातील प्रकरण 02 कलम 03 नुसार कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या फार विस्ताराने केलेली आहे. कोणत्याही स्त्रीचा प्रत्यक्ष छळ, मारहाण, धमकी, शिवीगाळ व लैंगिक शोषण, शाब्दिक छळ, भावनात्मक छळ, मानसिक छळ, आर्थिक छळ इत्यादींचा समावेश या व्याख्येत आहे.
2. 2005 च्या कायद्या अंतर्गत जी स्त्री पिडीत आहे, त्या स्त्रीबद्दल भा.दं.वि. 489 कलमाखाली विवाहित स्त्री बद्दल न अर्थ होता कुटुंबातील कोणत्याही स्त्रीवर अन्यायाबद्दलची बाब आहे.
3. पिडित स्त्री आपल्या कुटुंबातील पतीशिवाय इतर कोणत्याही नातेवाईकांवर गुन्हा दाखल करू शकते. यासाठी तिला राज्य सरकार नियुक्त संरक्षण अधिकारी, पोलीस अधिकारी, सेवा देणारी संस्था यांची मदतही घेतली घेवू शकते. अशी तरतुद 2005 च्या कायद्यांतर्गत आहे. सरंक्षण देणारी स्त्री असावी अशीही तरतूद आहे.
4. वरील वाक्यातील सेवा देणाऱ्या संस्थांना मान्यता असल्याने आता त्यांना काहीच अडचणी नाहीत. पुर्वी अशा संस्था पडद्या मागे होत्या. एखाद्या व्यक्तीला कौटुंबिक हिंसाचाराची माहिती द्यावयाची असेल आणि पीडित देत नसेल तर परकी व्यक्ती संरक्षण अधिकाऱ्यांना किंवा संरक्षण देणाऱ्या संस्थांना देऊ शकते. त्यांच्या नावाची गुप्तता राखली जाते.
5. पीडित स्त्रीला लवकरात लवकर न्याय मिळावा या हेतुने शासनाने तशा प्रकारची विशेष तरतुद या कायद्यांतर्गत कलम 12 (5) नुसार केलेली आहे.
6. 2005 च्या कायद्याच्या प्रकरण 04 मध्ये पीडित स्त्रीला सहकार्य करण्याची कार्यपालिका आहे. कलम 12 नुसार पीडित व्यक्तीच्या वतीने संरक्षण अधिकारी यांना न्याय अधिकाऱ्याकडे आपणास अवश्य मदतीचा स्वतंत्र अर्ज करावा लागतो.
7. 2005 च्या कायद्यांतर्गत पीडित स्त्रीला तिच्या हक्कांसाठी स्वतंत्र अर्ज किंवा दावा करण्याची गरज नाही. आपणास एकापेक्षा अधिक सरंक्षक सुद्धा घेऊ शकते आणि तसे अधिकारही न्यायधिशांना देण्यात आलेले आहेत. या आदेशाने प्रतिवादीला प्रतिबंधीतही केले जाते.

**संरक्षण आदेशाप्रमाणे –**

1. निवासी आदेश, 2. आर्थिक साह्यासंबंधी आदेश, 3. ताबा देण्यासंबंधी आदेश, 4. भरपाई आदेश, 5. अंतरिम किंवा एकतर्फी आदेश देण्याचा अधिकार इत्यादी पीडित स्त्रीच्या हक्कासंबंधीत आहेत. जर प्रतिवादी व्यक्तीने वरील कोणत्याही आदेशाचे पालन केले नाही तर त्या व्यक्तीस एक वर्ष शिक्षा/सजा किंवा 20,000/– रु. दंड किंवा दोन्ही प्रकारची शिक्षा होऊ शकते. जर असे दिसून आले की, प्रतिवादी हा भा.दं.वि. कलम 498 (अ) किंवा हुंडा प्रतिबंधक कायदा–1961 नुसार आरोपी सिद्ध होतो. याशिवाय न्यायधिशांना सुधारित गुन्हा हा दखलपात्र व आजामीनपात्र गुन्हा समजण्यात येतो. पीडित व्यक्तीच्या जबाबाला आधार मानून गुन्हा **दाखल करता येतो. परंतु न्यायालयाच्या निर्णयानंतर** त्याला शिक्षा ठोठावली जाते. कौटुंबिक हिंसाचार हा स्त्री **जातीसाठी एक अभिशापच ठरला आहे.**

परंतु जोपर्यंत कौटुंबिक हिंसाचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांना आपल्या हक्कासाठी व संरक्षणासाठी अशाप्रकारच्या कायद्याची माहिती होणार नाही. तोपर्यंत या कायद्याचा फारसा उपयोग होणार नाही. म्हणुन असे म्हटले जाते की, 2005 च्या कायद्याची सध्याच्या परिवर्तीत समाजाला खरी गरज आहे. कारण आज समाजातील सर्वत्र कौटुंबिक हिंसाचाराचा सावळा गोंधळ सुरु आहे. आपण दररोज दैनंदिन वर्तमापत्र व बातम्यांमध्ये अशा प्रकारच्या विविध घटना वाचतो, एकतो, स्त्रियांनी यासंदर्भात जनजाग्रतीची आवश्यकता आहे. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, ज्या समाजात अशा कायद्याची आवश्यकता आहे. त्या समाजात नेमकी परिस्थिती कशी आहे. स्त्री खऱ्या अर्थाने संरक्षित कोठे आहे. जर स्त्रियांबद्दल अशीच हिंसाचारात्मक परिस्थिती राहिली तर समाजात अराजकता निर्माण होण्यास वेळ लागणार नाही....

**संदर्भ सूची :**

गुप्ता / शर्मा, भारतीय सामाजिक समस्याएँ, साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.
व्यास मीनाक्षी, समकालीन भारतीयः समस्याएँ और समाधान, विकास प्रकाशन, कानपूर.
लोकराज्य, महिलांविषयी योजना व कायदे, मार्च 2018.
विकीपिडीया
www.कौटुंबिक अत्याचार
www.domestic violence
www.domestic violence Act-2005

Scanned with Oken Scanner